# मेट्रो-३ च्या कामाला पावसाळ्यानंतर सुरुवात

## २०२० पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याचा एमएमआरडीएचा मानस

■ मुंबई, प्रतिनिधी

**कुलाबा**-वांद्रे-सिप्झ या मेट्रो-३ च्या बांधकामाचे कंत्राट सात पॅकेजमध्ये पाच कंपन्यांना देण्यात आले आहे. तर दुसरीकडे जायकाकडून कर्ज मिळण्याची प्रकियाही वेगात सुर असून जमिन संपादनाचा प्रश्नही मार्गी लागला आहे. त्यामुळे मेट्रो-३ च्या बांधकाम ला सुरवात करण्याचा मार्ग मोकळा झाला असलयाचे सांगत मुंबई मेट्रो कॉर्पोरेशन लिमिटेडमधील एका उच्च पदस्थ अधिकाऱ्याने मेट्रो-३ च्या प्रत्यक्ष बांधकामाला पावसाळ्यानंतर ऑक्टोबरमध्ये सुरवात होणार असलयाचे सांगितले आहे.

३३.५ किमी मार्गाचा आणि अंदाजे १८,११४ कोटी रपये खर्चाचा हा भुयारी मेट्रो मार्ग आहे. हा मार्ग हाती घेऊन बराच काळ लोटला मात्र जमिन संपादनावरन विस्थापितांकडून झालेला विरोध आणि प्रकलपातील आर्थिक अडचणी यामुळे प्रकलपाचे काम काही मार्गी लागताना दिसत नव्हते. आता मात्र जमिन संपादनासह आर्थिक अडचणी दूर झालया असून रहिवाशांचा या मार्गाला असलेला विरोध मावळत असलयाचा दावाही या अधिकाऱ्याने केला आहे. त्यामुळे आता हा प्रकलप मार्गी लागणार असलयाचे एमएमआरसीकडून सांगितले जात आहे.